# भावी नागरिकांमध्ये जागतिक जाणिवांच्या शिक्षणाची गरज

**डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.


**प्रस्तावना:-**

हे विश्वची माझे घर अशी संत ज्ञानेश्वर सारखी संकल्पना आज खऱ्या अर्थाने रुजु होत आहे. त्यामुळे 'वसुधैव कुटुंम्बकम' हीच संकल्पना आपल्याला मान्य करावी लागेल आणि त्याच दृष्टिकोनातुन आपल्याला विद्यार्थ्यावर संस्कार करावे लागतील.

जागतिक जाणिवेमध्ये संपूर्ण जगाचा विचार करण्याची वृत्ती समाविष्ठ होते. संपूर्ण जगातील सांस्कृतीक वैविध्यता ,समस्या ,प्रगती व देशा देशातील परस्परावलंबीत्वाची जाणिव म्हणजेच जागतिक जाणिव. संपूर्ण जग जणु आपल कुटुंब असुन सर्व मानव हे आपले बंधु व भगिनी आहेत ही जागतिक जाणिवेची भावना. जगातील समस्या आपल्या समस्या मानून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे एकत्र येणे परस्पर सहकार्य करणे व जगाची प्रगती होउन सुख ,समाधान,शांतता कशी नांदेल याचा विचार जगाच्या जाणिवेत समाविष्ठ होतो खर म्हणजे हे एक उच्च मानवीय मूल्यच होय.

**जागतिक जाणिवेतील घटक :-**

जागतिक जाणिवेमध्ये खालील घटकांचा अंतर्भाव होतो.




**जागतिक जाणिवांची निगडीत असलेल्या बाबी:-**

आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढ, एड्स, इंधन, उर्जा समस्या, पर्यावरण असमतोल, युदधप्रवृत्ती, दहशतवाद या प्रमुख समस्या आहेत. हया (वैश्विक) जागतिक समस्या कॅनडा येथील व्हॅंकुव्हर शहरात युने-स्कोने एकविसाव्या शतकातील मानवी अस्तित्वासाठी जाहीरनामा प्रसिध्द केला होता.

जागतिक विज्ञान परिषद हगेंरी देशातील बुडापेस्ट शहरात २६ जुन ते१ जुलै १९९९ रोजी झाली. परिषदेला विषय ''एकविसाव्या शतकातील विज्ञान एक नवीन बांधीलकी'' असा होता. १५५ देशातुन अठराशे प्रतिनीधी हया परिषदेस उपस्थित होते.

वरील समस्यांच्या संदर्भात मूलभूत संशोधन होणे गरजेचे आहे. एकुण समस्या केंद्रित संशोधनास प्रोत्साहन मिळावे म्हणुन तशी जागतिक जाणिव विद्यार्थ्यामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे.

**जागतिक जाणिवेचे महत्व:-**

''बुध्दिमत्ता ही वैश्विक संपदा आहे'' व ''मानव तितुका एक'' त्यामुळे एका देशाने विकसित केलेले तंत्रविज्ञान, ज्ञान ही केवळ त्या राष्ट्रापुरती मर्यादीत राहता कामा नये व २१ व्या शतकात ते शक्य नाही. आज आपल्या देशातुन योग-विदया, आयुर्वेद इ. ज्ञान अन्य देशात जात आहे. ४७ हजार कोटी रुपयांचे सॉफ्टवेअर देशातून निर्यात केले जात आहे. येत्या काही वर्षात ते काही लक्ष कोटी रुपयांपर्यत जाईल असा अंदाज वर्तवला गेला आहे. आपल्या देशापुरता विचार केला तर देशाची म्हणुन काही बलस्थाने आहेत प्रचंड मनुष्यबळ, नैसर्गिक साधनसंपत्ती प्रामुख्याने खनिज संपत्ती, प्रदीर्घ सागर किनारा असल्याने सागरी सपत्तीची विपुलता वर्षातुन सुमारे१० महीने सातत्याने मिळणारी प्रचंड सौर उर्जा वैविध्यपुर्ण हवामान ही आहेत. वर्षात पडणारा सरासरी पाऊस समभागात विखुरला तर भू-जल पातळीत एक मीटरने वाढ होईल. म्हणून या काळात आपला देश विज्ञानाच्या मदतीने वरील प्रत्येक क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित करेल असा आर्शावाद मा. राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व डॉ. वाय. एस. राजन लिखित "India 2020: A Vision For New



Vol:2nd, Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June 2013,ISSN : 2319-5525

Millenium" g;k पुस्तकांत वर्तविला आहे.


पृथ्वीवरील एका ठिकाणचे पर्यावरण बिघडले असता तेथील क्षेत्रातच नव्हे तर संपूर्ण जगातही त्याचे परिणाम भोगावे लागतात उदा. अणुबॉम्ब हल्याने संपूर्ण जगातील वातावरणातील परिणाम, जंगलतोडीमुळे जागतिक तापमानवाढ त्यामुळे जागतिक पर्यावरणाबाबत जागरुकता, पर्यावरण संवर्धनासाठी योग्य वृत्ती भावी नागरिकांमध्ये निर्माण होण्यासाठी जागतिक जाणिवेची गरज आहे.

जगातील विविध संस्कृतीबाबत योग्य तो आदरभाव निर्माण व्हावा व त्यातुन योग्य ते गुण, विचार स्विकारण्याची विशाल मनोवृत्ती निर्माण होण्यासाठी जागतिक जाणिवेची गरज आहे.

जगामध्ये विविध ठिकाणी घडणाऱ्या घटना उदा. बॉम्बस्फोट, दुर्घटना त्सुनामी, भुकंप, ज्वालामुखी इ. बाबत सह संवेदनशीलता निर्माण होण्यासाठी व विविध घटनांत झालेल्या नुकसानास मदत म्हणुन मानव या नात्याने सहकार्य करण्याची वृत्ती निर्माण करण्यासाठी जागतिक जाणिवेची गरज आहे.

**जागतिक जाणिवा निर्माण झालेल्या नागरिकांचे गुण:-**

ज्या विद्यार्थ्यामध्ये/नागरिकांमध्ये जागतिक जाणिव निर्माण झाली आहे त्याचे गुण खालीलप्रमाणे आपल्याला दिसुन येतील.




**विविध उपक्रम:-**

जागतिक जाणिव विद्यार्थ्यामध्ये निर्माण करण्यासाठी शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये पुढील उपक्रम राबवावेत.

१ अखिल मानवजाती विषयी जिव्हाळा निर्माण करण्यासाठी वैश्विक समस्येवर चर्चासत्र, वादविवाद, व्याख्याने आयोजित करावेत.

२ वैश्विक प्रगतीसाठी परिसंवादाचे आयोजन करावे.

३ परिपाठामध्ये शास्त्रज्ञांच्या बोधकथा, चारित्रकथा यांचा समावेश करावा.

४ मूल्यशिक्षणाच्या तासिकेतून जागतिक जाणिव स्पष्ट करावी.

५ विविध जागतिक दिन साजरे करावेत. उदा. एडस दिन, जागतिक आरोग्य दिन ,जागतिक महिला दिन, मानवी हक्क दिन इ. उदा. युनो डे. या दिनाच्या निमित्ताने युनेस्कोच्या जागतिक कार्याचा परिचय करावा.

६ विविध देशाचे स्वातंत्र्य दिन साजरे करावे. देशाबद्दल माहिती द्‌यावी. देशाचे वैश्विक प्रगतीतील योगदान सांगावे.

७ विज्ञान शोध, संशोधक, शास्त्रज्ञ, जागतिक संशोधन संस्था इ. ची माहिती संग्रह करण्यास सांगावी

८ वर्तमानपत्रातील विविध विषयासंबधीचे शोध संबंधी कात्रणे गोळा करण्यास सांगावीत.

९ सर्व देश, वेश, धर्म, भाषा, काळ विसरायला लावणाऱ्या विभूतींचा विश्वव्यापक रितीने परिचय करुन द्‌यावा. उदा. लता मंगेशकर, महेद्रसिंग धोनी, स्टेफी ग्राफ, न्यूटन, मेरी क्युरी, ए.आर. रेहमान, मदर टेरेसा, नेल्सन मंडेला इ.

१० विविध देशातील लेखक ,शास्त्रज्ञ यांचे व्याख्यान आयोजित करावेत.

११ शिक्षक, विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर अदला-बदल करावी.

१२ पेन फ्रेंड, फोन फ्रेंड, ई-मेल, यांसारख्या उपक्रमातून विविध देशांतील विद्यार्थ्यांची ओळख करुन द्‌यावी.

१३ इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या विविध साईट्सवरील ज्ञान घेण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.

**समारोप:-**

जागतिक जाणिवेमध्ये जगातील सर्व मानवांचा धर्म ,वंश, जात, भाषा, प्रांत ,देश इत्यादी संकुचतेच्या सर्व भिंती आपोआपच गळून पडल्या पाहीजेत. सर्व जगातील मानव प्राणी एक सारखाच आहे. त्याने लावलेल्या शोधावर, ज्ञानावर, प्रगतीवर सर्व मानवजातीचा सारखाच हक्क आहे.

...



Vol:2nd, Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June 2013,ISSN : 2319-5525